# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,

## नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – ४२२००३

परिपत्रक क्र./नाविमं/लेखा/ अंशत: परीक्षा शुल्क परतावा मुदतवाढ /4306 दिनांक – 13 /०९/२०२२

विषय :– फेब्रु–मार्च २०२१ च्या परीक्षेचे इ. १० वी व इ. १२ वीच्या विद्यार्थ्यांचे परीक्षा शुल्क परतावा मुदतवाढ देणेबाबत.

संदर्भ :– क्र.रा.मं./लेखा–६/५१८५ दि. ०६/०९/२०२२ रोजीचे पत्र.

उपरोक्त विषय व संदर्भिय पत्रास अनुसरून आपणास सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, नाशिक विभागीय मंडळ, नाशिक मार्फत सन २०२१ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) च्या मुख्य परीक्षा शासन निर्णयानुसार (कोविड–१९ च्या प्रादुर्भावामुळे) रदद करण्यात आली. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या आदेशानुसार सन २०२१ मधील माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा (इ. १० वी) व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (इ. १२ वी) चे परीक्षेकरिता नोंदणी केलेल्या विद्यार्थ्यांना अनुक्रमे रू. ५९/– (इ. १० वी) व रू. ९४/– (इ. १२ वी) परीक्षा शुल्क परत करणेबाबत विभागीय मंडळाच्या कार्यकक्षेतील सर्व मान्यता प्राप्त शाळा व कनिष्ठ महाविद्यालय यांना परिपत्रक क्र.ना.वि.मं. /लेखा परीक्षा शुल्क परतावा २०२१/ २४४९, दि. २४/१२/२०२१ परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे.

सदर योजनेस येणा–या अडचणी विचारात घेता राज्य मंडळाने दिनांक ३१/०८/२०२२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअनुषंगाने सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना दि. ०८/०७/२०२२ परिपत्रकाद्वारे कळविण्यात आलेले आहे.

अद्यापही काही शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांना परीक्षा शुल्क परताव्याची नोंदणी करण्यास ऑनलाईन अडचणी येत असल्याचे, परीक्षा शुल्क परताव्याची नोंदणी केली नसल्याने, नोंदणी करतांना खाते क्रमांक/आयएफएससी कोड चुकीचा भरला त्यामुळे शुल्क जमा न झाल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे **राज्य मंडळाने सदर योजनेस दिनांक ३१/१०/२०२२ पर्यंत मुदतवाढ दिलेली आहे. त्याअनुषंगाने सदरची माहिती भरण्याची कार्यवाही सर्व शाळा व कनिष्ठ महाविद्यालयाने त्वरीत करावी.**

(राजेंद्र अहिरे)
विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्य, व उच्च माध्य. शिक्षण मंडळ,
नाशिक विभागीय मंडळ, नाशिक – **422003**

प्रति,

मुख्याध्यापक/प्राचार्य
नाशिक विभागीय मंडळाचे कार्यकक्षेतील
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा व कनिष्ठ महाविद्यालय